# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक ८ ]

**दिनांक : १४ /१०/२०१६** **वेळ : दुपारी १२.०० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक १४/१०/२०१६ रोजी दु. १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

1. मा. पांढरकर निलेश शंकरराव – सभापती
2. मा. बाबर शारदा प्रकाश
3. मा. सुभद्रा ईश्वर ठोंबरे
4. मा. भारती फरांदे
5. मा. आर.एस.कुमार
6. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
7. मा. नेटके सुमन राजेंद्र
8. मा. तरस बाळासाहेब जयवंत
9. मा. प्रसाद शेट्टी
10. मा. टेकवडे सुजाता अविनाश
11. मा. सतिश झांबरे [ स्वीकृत सदस्य ]

तसेच श्रीम. आशादेवी दुरगुडे - क्षेत्रीय अधिकारी, श्री. सतिश इंगळे - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री मिलींद कपिले – कार्यकारी अभियंता, विदयुत , श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.सुनिल वाघुंडे, श्री. अनिल शिंदे , श्री बन्सल एच पी., श्री शिंदे एच .एस. , श्रीम बाबर एल.एस., श्रीम मोमीन झेड.आय. - उपअभियंता, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री. शेख एस के. - कनिष्ठ अभियंता, श्री आर.एन. पिंगळे – एपीआय, निगडी वाहतूक, श्रीम विजया कारंडे – पीआय, चिंचवड वाहतूक विभाग , श्री स्वप्निल पवार – विदयुत इ. उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. पांढरकर निलेश यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

सन्मा. सदस्य श्री आर एस कुमार यांनी सन्मा. सदस्या वैशालीताई काळभोर यांचे कार्यालयामध्ये दगडफेक करुन ऑफिसमधील वस्तुंची तोडफोड केल्याच्या निषेधार्थ आजची सभा 10 मिनिटे तहकूब करावी अशी सुचना केली. सदर सुचनेस सन्मा. सदस्या भारती फरांदे यांनी अनुमोदन दिले. सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन प्रस्तुतची सभा पुढील 10 मिनिटांपर्यंत तहकूब करीत असल्याचे सभापती, निलेश पांढरकर यांनी जाहीर केले. तद्नंतर प्रस्तुत सभा पुढे continue करणेत आली.

त्यानंतर सर्वप्रथम मागील सभेचा सभावृत्तांत [ दि. १४/९/२०१६ कार्यपत्रिका क्रमांक ७ ] वाचून कायम करणेत आला. सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक ५ : मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य यांचेकडील दि.** 9/10/16 **चा प्रस्ताव**
अ प्रभाग **स्था**पत्य विभागाकडील स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरील तरतूद अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर वर्ग करणेबाबत विचार करणे**.**

**विषय क्रमांक ६ : सन्मा. सदस्य श्री आर एस. कुमार यांचा प्रस्ताव**
प्रभाग क्रमांक **14** भक्ती शक्ती येथील आकुर्डी रेल्वे स्टेशनकडून आणि पी**.**सी**.**सी**.** ओ**.** कॉलेज येथील रेल्वे लाईन क्रॉस केलेल्या चौकाला **इनर व्हिल क्लब** चौक असे नांव देणेबाबत विचार करणे**.**

**विषय क्रमांक ७ : मा. सभापती, निलेश पांढरकर, सदस्या प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव**
प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाणमध्ये श्री हनुमान मंदिराच्या समोरील पत्राशेडमधील पत्रे जिर्ण व नादुरुस्त झालेले आहेत. सदर पत्राशेडमध्ये सांस्कृतिक व सामजिक कार्यक्रम नागरिकांमार्फत केले जातात. त्यामुळे आकुर्डीतील ग्रामस्थांनी व नागरिकांनी त्या ठिकाणचे जुने झालेले पत्राशेड काढून नागरिकांच्या सोयीसाठी आरसीसी स्लॅब करणेची मागणी केलेली आहे. तरी सदर आरसीसी स्लॅबचे कामास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक ८ : सन्मा. सदस्य श्री. बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव**
प्रभाग क्रमांक १८ किवळे भागातील किवळे गावठाणाकडे जाणा-या मुख्य चौकास **श्री बापदेव महाराज चौक** तसेच विकासनगर व किवळे गावाकडे जाणा-या रस्त्यावर प्रत्येकी दोन दिशादर्शक् फलक लावणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ९ : सन्मा. सदस्या सुभद्रा ठोंबरे यांचा प्रस्ताव**
प्रभाग क्रमांक 10 अजंठानगर येथील कमानीला **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत** असे नाव देणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक 10 : सन्मा. सदस्या शारदा बाबर यांचा प्रस्ताव**
मनपाच्या 2015-16 च्या अंदाजपत्रकामध्ये झोनिपु स्थापत्य विभागामार्फत बनसोडे निवास येथील संडास बांधण्याचे नियोजित काम तेथील जागेची अडचण लक्षात घेता त्याच वॉर्डमधील धोबीघाट, दत्तनगर [ पुरुष 8 सिटस ] बनसोडे निवास येथील संडासची दुरुस्ती करण्यासाठी वापरणेस मान्यता देणे.

वरील प्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : ५३ | विषय क्रमांक : १ |
| दिनांक : १४/१०/२०१६ | विभाग : |
| सुचक : मा. आर एस कुमार | अनुमोदक : मा. शारदा बाबर |

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास **"हस्तीमल शेठ गादिया मार्ग"** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत

विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ५४ विषय क्रमांक : २
दिनांक : १४/१०/२०१६ विभाग :
सुचक : मा. सुजाता टेकवडे अनुमोदक : मा. सुभद्रा ठोंबरे

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.
शुभारंभ कॉलनी, स.नं. (१३१/२ व १३०/१ मधील) यास **शुभारंभ कॉलनी** असा नामफलक बसवून मिळणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------

ठराव क्रमांक : ५५ विषय क्रमांक : ३
दिनांक : १४/१०/२०१६ विभाग :

सुचक : मा. भारती फरांदे अनुमोदक : मा. सुमन नेटके

संदर्भ : मा. संगिताताई भोंडवे, नगरसदस्या यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

रावेत बीआरटीएस रोडवरती श्री. बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलकाशेजारील चौकास **" कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक "** असे नाव देण्यात यावे. तसेच सोनटक्के वस्ती सर्व्हे १२/५ रावेत या ठिकाणी **" यशवंत नगर , सोनटक्के वस्ती "** असे नामकरण करणेत यावे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.
ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ५६ विषय क्रमांक : ४
दिनांक : १४/१०/२०१६ विभाग :
सूचक : मा. सुजाता टेकवडे अनुमोदक : मा. प्रसाद शेट्टी

संदर्भ :- मा. सदस्या सुजाता टेकवडे, मा. वैशाली काळभोर यांचा दि. ३/१०/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 26 मधील मोहननगर येथील श्रीम लिलाबाई खिवंसरा म.न.पा. शाळेजवळील विरंगुळा केंद्रास व कै. शंकर शेट्टी उदयान येथील प्रस्तावित कमानीस **स्व. अविनाशदादा टेकवडे** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ५७ विषय क्रमांक : ५
दिनांक : १४/१०/२०१६ विभाग :
सूचक : मा. आर. एस. कुमार अनुमोदक : मा. प्रसाद शेट्टी

संदर्भ :- मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य यांचेकडील पत्र क्र. स्था/कावि/१८६/१६ दि. ९/१०/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन 2016-17 या आर्थिक वर्षासाठी अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. ३०,०००/- [ तास हजार फक्त ] तरतुद करण्यात आलेली होती. तथापि, सदरची तरतुद खूपच अपुर्ण आहे. स्थापत्य विभागामध्ये सन 2015-16 मध्ये शिकावू उमेदवारांची नियुक्ती झाल्यामुळे सदरची तरतुद अपुरी पडत आहे. मे 2016 ते सप्टेंबर 2016 या पाच महिन्याच्या विदयावेतनाकरीता र.रु. ५०.०००/- [ पन्नास हजार फक्त ] खर्च येणार आहे. तसेच सन 2016-17 या आर्थिक वर्षामध्ये नव्याने शिकावू उमेदवारांची नियुक्ती झाल्याने त्याच्या विदया वेतनाकरीता तरतुदीची आवश्यकता आहे.

अ प्रभाग स्थापत्य या विभागामध्ये स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. ८०,६३,०९६/- [ ऐंशी लाख त्रेसष्ट हजार श्याहन्नव फक्त् ] इतकी तरतुद शिल्लक आहे त्यापैकी र.रु. १,००,०००/- [ एक लाख फक्त ] तरतुद अ प्रभाग स्थापत्य् अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ५८ विषय क्रमांक : ६
दिनांक : १४/१०/२०१६ विभाग :
सूचक : मा. आर. एस. कुमार अनुमोदक : मा. भारती फरांदे

संदर्भ :- मा. सदस्य आर. एस. कुमार ,मा. भारती फरांदे यांचा दि. १४/१०/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक **१४** भक्ती शक्ती येथील आकुर्डी रेल्वे स्टेशनकडून आणि पी**.**सी**.**सी**.** ओ**.** कॉलेज येथील रेल्वे लाईन क्रॉस केलेल्या चौकाला **इनर व्हिल क्लब चौक** असे नांव **देण्यास** मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : ५९ | विषय क्रमांक : ७ |
| दिनांक : १४/१०/२०१६ | विभाग : |
| सूचक : मा. निलेश पांढरकर | अनुमोदक : मा. प्रतिभा भालेराव |

**संदर्भ** :- मा**.** सभापती**,** निलेश पांढरकर**,** सदस्या **मा.** प्रतिभा भालेराव यांचा **दि. १४/१०/२०१६ चा** प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाणमध्ये श्री हनुमान मंदिराच्या समोरील पत्राशेडमधील पत्रे जिर्ण व नादुरुस्त झालेले आहेत. सदर पत्राशेडमध्ये नियमितपणे सांस्कृतिक व सामजिक कार्यक्रम नागरिकांमार्फत केले जातात. त्यामुळे आकुर्डीतील ग्रामस्थांनी व नागरिकांनी त्या ठिकाणचे जुने झालेले पत्राशेड काढून नागरिकांच्या सोयीसाठी आरसीसी स्लॅब करणेची मागणी केलेली असल्याने सदर ठिकाणी आर.सी.सी. स्लॅबचे काम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : ६० | विषय क्रमांक : ८ |
| दिनांक : १४/१०/२०१६ | विभाग : |
| सूचक : मा. बाळासाहेब तरस | अनुमोदक : मा. सुमनताई नेटके |

**संदर्भ** :- मा**.** सदस्य **बाळासाहेब तरस , मा.** सुमनताई नेटके यांचा **दि. १३/१०/२०१६ चा** प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १८ किवळे भागातील किवळे गावठाणाकडे जाणा-या मुख्य चौकास **श्री बापदेव महाराज चौक** असे नाव देणेस तसेच विकासनगर व किवळे गावाकडे जाणा-या रस्त्यावर प्रत्येकी दोन दिशादर्शक् फलक लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : ६१ | विषय क्रमांक : ९ |
| दिनांक : १४/१०/२०१६ | विभाग : |
| सूचक : मा. सुभद्रा ठोंबरे | अनुमोदक : मा. शारदा बाबर |

**संदर्भ** :- मा**.** सद**स्या** सुभद्रा ठोंबरे **मा.** शारदा बाबर यांचा **दि. १४/१०/२०१६ चा** प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 अजंठानगर येथे 8 ते 10 हजार लोकवस्ती असून तेथील कमानीला **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत** असे नाव देण्यास व त्याकामीच्या खर्चास् मान्यता देणेबाबत विचार करणे .

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

**-----**

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : ६२ | विषय क्रमांक : १० |
| दिनांक : १४/१०/२०१६ | विभाग : |
| सूचक : मा. शारदा बाबर | अनुमोदक : मा. सुभद्रा ठोंबरे |

**संदर्भ** :- मा. सदस्या **मा.** शारदा बाबर, मा. राम पात्रे यांचा **दि. १४/१०/२०१६ चा** प्रस्ताव

मनपाच्या 2015-16 च्या अंदाजपत्रकामध्ये झोनिपु स्थापत्य विभागामार्फत बनसोडे निवास येथील संडास बांधण्याचे नियोजित काम तेथील जागेची अडचण लक्षात घेता त्याच वॉर्डमधील धोबीघाट, दत्तनगर [ पुरुष 8 सिटस ] बनसोडे निवास येथील संडासची दुरुस्ती करण्यासाठी वापरणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या मासिक सभेचे कामकाज होऊन मा.सभापती निलेश पांढरकर यांनी सर्व उपस्थित सन्मा. नगरसदस्य / नगरसदस्या, अधिकारी / कर्मचारी यांना दिपावलीच्या हार्दीक शुभेच्छा देऊन प्रस्तुतची सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
**( निलेश शंकरराव पांढरकर )**
**सभापती**
**अ प्रभाग समिती**

क्र. अक्षेका /११/कावि/४२१/२०१६
दिनांक : २८/११/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी - ४४

प्रति, सर्व संबंधित विभाग